# पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

जाहिरात क्र.
दिनांक :

पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या उर्दू माध्यमिक विद्यालयाकडे खाली नमूद केलेल्या हुद्याच्या जागा भरण्यासाठी निवड/प्रतिक्षायादी तयार करण्याकरिता विहित शैक्षणिक पात्रता व इतर पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.एस्सी.(गणित), बी.एड. (गणित, शास्त्र) | ३ (सर्वसाधारण) |
| २ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.एस्सी.(भौतिक/रसायनशास्त्र), बी.एड.(विज्ञान /गणित) | १ (सर्वसाधारण) |
| ३ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.ए. ( इंग्रजी) बी.एड ( इंग्रजी/अन्य कोणताही विषय) | ४ (सर्वसाधारण) |
| ४ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.ए. (इतिहास) बी.एड.(इतिहास/अन्य कोणताही विषय) | ४ (सर्वसाधारण) |
| ५ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.ए.(उर्दू) बी.एड.(उर्दू/ अन्य कोणताही विषय) | ३ (सर्वसाधारण) |
| ६ | उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक, द.म. रु. ४०००/- एकवट मानधन | बी.ए. (उर्दू / हिंदी) / बी.एड. (उर्दू/ अन्य कोणताही विषय) | २ (सर्वसाधारण) |
| **उमेदवाराचे इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण उर्दू माध्यमातून झाले असणे आवश्यक आहे.** | | | |

## अटी :-

(१) **मे.महाराष्ट्र शासन , शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि – २ दिनांक १३ ऑक्टोबर २००० नुसार शिक्षण सेवक या पदावर तीन शैक्षणिक वर्षे ( उर्दू माध्यमिक शिक्षण सेवक एकवट मानधन रु. ४०००) अर्थात किमान ३ वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवारास शिक्षकांच्या नियमित पदावर वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येईल.**

(२) **वयोमर्यादा** : (अ) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास गणले जाईल.(ब) सदर दिवशी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व कमाल वय ३३ वर्षे असावे.मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयामर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहिल.(क) माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/अपंग/अंशकालीन कर्मचारी यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल.(ड) खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन शासन नियमानुसार कमाल वयोमयादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.(इ) स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्यांसाठी उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. (ई) पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागू होणार नाही.

(३) महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग,शासन निर्णय क्र. संकिर्ण १०९३/प्र.क्र.३६६/का-२ दिनांक २२/०७/१९९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

(४) शासन आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी आवश्यक असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पासाठी प्राधान्य.

(५) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू, अंपग यांच्यासाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

(६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आरक्षण अधिनियम २००१ अनुसार प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व इतर मागासवर्गीय व विजा - अ गटासाठी लागू आहेत. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(७) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२ दिनांक २५/०५/२००१ मधील तरतूदीनुसार राहिल. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २००७-/२००८ या कालावधीतील नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र जवळ असणे आवश्यक आहे.

(८) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही.२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याचे दृष्टीने दिनांक २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणूकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापत्र संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(९) शासन धोरणानुसार मान्यताप्राप्त संस्थेतून महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील (एमएससीआयटी) ही संगकणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्रं.प्रशिक्षण २०००/प्रकरण ६१/२००१/३९ दिनांक १९/०९/२००३ अन्वये सदर संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील.

(१०) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग क्र.रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३०/०४/२००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ट अ मध्ये नमूद) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असले पाहिजे.

(११) अर्ज करताना उमेदवारानी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

(१२) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

(१३) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याने जिल्हा सैनिक कल्याण बोर्डामध्ये नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(१४) भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमूद केलेले प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

(१५) अपंग प्रवर्गातील उमेदवारांजवळ अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिलेले वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(१६) मागावर्गीय प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांजवळ त्यांच्या जातीचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(१७) स्टाफ ॲप्रुव्हल व इतर कारणांमुळे जाहिरातीतील रिक्त पद संख्येत / आरक्षणामध्ये कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(१८) अर्जदाराने आपले अर्ज महानगरपालिकेने निश्चित केलेल्या अर्जामध्ये केले पाहिजेत. **खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी रु.१००/- किंमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.५०/- किंमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली**

**(१) मा.उप आयुक्त क्र.१, घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालयासमोर, पुणे - ५,**

**(२) मा.उप आयुक्त क्र. २ ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय, ढोले पाटील मार्केट इमारत, पुणे - १,**

**(३) मा.उप आयुक्त क्र.३, टिळक रोड क्षेत्रीय कार्यालय, ९९०, शुक्रवार पेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन, टिळक रोड, पुणे - ३०**

**(४) मा.उप आयुक्त क्र. ४ टिळक रोड क्षेत्रीय कार्यालय, ९९०, शुक्रवार पेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन, टिळक रोड, पुणे - ३०**

**येथे दिनांक २५/०१/२०१० ते दिनांक ०५/०२/२०१० अखेर (पर्यत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत विकत मिळतील व दिनांक ०६/०२/२०१० दुपारी ४.०० पर्यंत स्वीकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हीपीने मनिऑर्डर रक्कम स्वीकृत करुन पाठविले जाणार नाही.**

(१९) मुलाखतीस बोलविण्यांत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

(२०) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(२१) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तत्रांचा वापर करतानां आढळल्यास उमदेवारी आपोआप रद्दबातल होईल.तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

(२२) अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेचे दाखले, गुणपत्रिका व अनुभवाच्या दाखल्यांचा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (ट्रु कॉपी) जोडणे आवश्यक आहे.

(२३) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण वा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता तसेच फोटो नसलेले, अर्जावर स्वाक्षरी नसलेले, खाडाखोड केलेले, विसंगत माहिती असलेले अर्ज अपात्र समजले जातील. अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(२४) रिक्त पदांच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित केली जाईल.

(२५) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

(२६) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णयानुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

(२७) सदर पदांच्या बाबतीत मुलाखतीचा कार्यक्रम अंतिम करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना राहिल.

(२८) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी भरतीची जाहिरात देण्यांत येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य ठरेल त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

सही /-
महेश झगडे
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका